अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# आषाढस्य प्रथम दिवसे.....

एखाद्या देशाला, समाजाला जेव्हा संस्कृतीचा, इतिहासाचा संपन्न वारसा लाभतो तेव्हा तो उच्च गुणवत्ता आणि पराक्रम या दोन बाबींवर आधारित असतो. गुणवत्तेत तपश्चर्या आपोआपच समाविष्ट होते. भारताची सांस्कृतिक आणि साहित्यिक संपन्नता ही अशाच एका उदात्त गुणवत्तेचा परिपोष आहे. आज कालिदास दिन म्हणजेच कवीकुलगुरु ही पदवी केवळ ज्याच्यासाठीच यथार्थ ठरावी अशा कालिदासाच्या गुणवत्तेचे गुणगान करणारा हा दिवस. म्हटलं तर आषाढ महिन्याचा हा पहिला दिवस त्याची आणि त्याच्या कलाकृतींच्या स्मृती जागवणारा दिवस म्हणता येईल. आषाढ महिन्याचा हा पहिला दिवस दरवर्षी साहित्य आणि सांस्कृतिक क्षेत्रात कालिदास दिन म्हणून साजरा होतो. त्याने लिहिलेल्या मेघदूत या खंडकाव्यामध्ये आलेले अतिशय रमणीय असे आषाढ महिन्यातील निसर्गवर्णन आणि या संदर्भात व्यक्त झालेला आषाढस्य प्रथम दिवसे हा प्रसिध्द श्लोक हे निमित्त साधून कालिदास दिनाचे औचित्य साधले. भारतीय संस्कृती पुन्हा प्राचीन साहित्याची एक वेगळीच ओळख सांगायची म्हणजे त्याच्या रचनाकारांनी, साहित्यिकांनी किंवा संस्कृत कवींनी पाळलेले स्वत:विषयीचे मौन होय. म्हणजे स्वत:विषयी काही न सांगता केवळ आपल्या साहित्यकृतीतून वाङमयातून आपली गुणवत्ता व्यक्त करीत राहायचे. रसिकांनी, वाचकांनी त्या कलाकृतीवरून आपली इयत्ता ठरवावी असा एक उदात्त विचार त्यामागे दिसून येतो. कालिदासाच्याबाबतीतही नेमके हेच घडले आणि त्याच्या सगळ्या साहित्यात स्वत:च्या नावाशिवाय त्याचा कोणताही उल्लेख मिळत नाही. अगदी त्याच्या जन्मतिथीपासून ते कर्मभूमीपर्यंत कोणतीच माहिती उपलब्ध होत नाही. त्याने लिहिलेल्या साहित्यातून त्याचे जन्मस्थळ, कर्मस्थळ ठरवण्याचा प्रयत्न अभ्यासकांनी केला. आणि मग उपमा आणि अलंकारांनी श्रेष्ठत्व सिध्द केलेल्या या कालिदासाचे स्मरण अशा रितीने आषाढाच्या पहिल्या दिवशी करण्याची परंपरा पडली. म्हणजेच मौनातून ओळख देणारा हा कवी जगविरहित ठरतो आणि केवळ त्याच्या सर्वोत्तम वाङमयामुळे किंवा काव्यामुळे त्याच्या स्मृती जागवण्याचा प्रकारही जगविरहित ठरतो. कालिदासाविषयी आदर व्यक्त करणारा आणि त्यानिमित्ताने भारतीय संस्कृत साहित्याचे, साहित्यिक गुणांचे आवर्तन घडवण्याचा प्रयत्न याच निमित्ताने होताना दिसतो.

## संस्कार विचारांच्या पाऊलखुणा

वर्षाऋतू सुरू झाल्यानंतर घनगंभीरपणे कोसळणारा पाऊस, आषाढ महिन्यात आकाशात जमा होणाऱ्या काळ्याकुट्ट मेघांची गर्दी, वातावरणातली एक प्रसन्नता याचे अगदी सामान्य माणसालासुध्दा आकर्षण वाटते तर याच निसर्गाच्या श्रीमंतीला आपल्या उपमा-अलंकाराने सुशोभित करण्याचा मोह कालिदासासारख्या श्रेष्ठ कवीला झाला नसता तर ते नवलच होते. आषाढातल्या या मेघाला आपला दूत बनवण्याची आणि विरह वेदनेने व्याकुळ झालेल्या प्रेयसीसाठी कल्पनेतून अलकानगरी साकार करण्याची त्याची बुध्दीमत्ता एका श्रेष्ठतेचीच साक्ष देते. मेघदूतातला यक्ष ज्या मेघाला अनेक गोष्टी सांगतो त्या आपल्या प्रेयसीपर्यंत पोहचवण्याची विनंती करतो. विदर्भातल्या रामगिरीपासून ते हिमालयाच्या परिसरातल्या अलकानगरीपर्यंतचा प्रवास आपल्या कल्पनाशक्तीने कालिदासाने रंगवला ते करीत असताना उज्जैनी नगरीचा त्याने केलेला उल्लेख मार्गात येणारे विविध पर्वत, नद्या याविषयीची त्याने दिलेली माहिती त्या सगळ्या गोष्टी कालिदासाच्या साहित्यिक संपदेची उपमा-अलंकाराची श्रीमंती दाखवणाऱ्या ठरतात. त्यामधून व्यक्त होणारा प्रणय निसर्गप्रेम किंबहुना उदात्तता आणि मांगल्याच्या गुणांचे दर्शन घडवणाऱ्याच म्हणायला लागतील. कारण त्यामधली काव्यात्मक सौंदर्यता ही निसर्ग आणि मनुष्य यांच्यातल्या नात्याचेदेखील पदर उलगडून दाखवते. मेघदूताचे दोन भाग पडतात. एक पूर्वमेघ आणि उत्तरमेघ पूर्वमेघामध्ये यक्षाचा संदेश कसा पोहचवायचा याचे वर्णन आलेले आहे. तर उत्तर मेघामध्ये अलकानगरीचा निवासी असलेला यक्ष स्वत:च्या प्रिय परिसराचे मनोज्ञ वर्णन करताना आढळतो. उत्तर मेघामध्ये कालिदासाची प्रतिभा इतकी खुलली आहे की, ती बघितल्यानंतर केवळ कल्पनेच्या जोरावर त्याने निर्माण केलेली जादुई नगरी त्याची कवीकुलगुरु पदवी किती सार्थ आहे याचीच साक्ष पटवते. फारसे मोठे कथानक नसलेल्या मेघदूतात यक्ष आणि त्याच्या पत्नीमधील वियोगाची मानसशास्त्रीय गुंफण केलेली आहे. निसर्गाचे साहचर्य आणि तितकीच त्याची सहज विरह संवेदना हे मेघदूत काव्याचे वैशिष्ट्य आहे. असा हा उत्तम प्रतिभेचा कवी काव्याच्या अंगाने संस्कार आणि विचारांच्या पाऊलखुणा जपतो आणि येणाऱ्या प्रत्येक पिढीला जगण्याचा नवा आत्मविश्वास देतो. यावरून त्याच्या साहित्याचे सौष्ठव स्पष्ट होते.

## सोन्यामुळे रत्नाला शोभा

आज हजारो वर्षानंतरही कालिदास हा त्याच्या साहित्य आणि वाङमयामुळे लक्षात राहावा किंबहुना त्याच्या उपमा अलंकारांचा अभ्यास करता करता आनंदाचे निधान मिळवावे अशी आर्तता निर्माण होते हे विलक्षणच म्हणावे लागेल. आजच्या विज्ञान-तंत्रज्ञान युगामध्ये प्राचीन साहित्य संस्कृताचे नव्या पिढीला फारसे आकर्षण नसेल. परंतु ज्यांना भारतीय संस्कृती आणि इतिहास समजून घ्यायचा असेल त्यांच्यासाठी कालिदास हा निश्चितच मार्गदर्शक ठरू शकतो. उलट आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कालिदासाच्या या बौध्दिक संपदेचे संरक्षण करता येईल. जर्मन कवी गटे यालादेखील आपल्या प्रेमात पाडण्याची किमया कालिदासाच्या साहित्याने केली. त्याचे विक्रमोर्वशिय नाटक अनेक अभ्यासकांना वेड लावणारे ठरले. तर शाकुंतल नाटकातल्या एका कल्पनारम्यतेला वास्तवाचे कोंदण बहाल करण्याचे कौशल्य कालिदासाने दाखवले. कोणीतरी अभ्यासकाने म्हटले आहे की, रत्न हे सोन्यापेक्षाही मौल्यवान असते. परंतु सोन्याच्या कोंदणामुळेच त्याची शोभा वाढते. म्हणूनच कालिदासाचे साहित्य हे त्याच्याच उपमा अलंकाराच्या कोंदणामुळे अधिक शोभून दिसते. असा हा भारतीय संस्कृतीचे वैभव वृध्दिंगत करणारा श्रेष्ठ कवी आपल्याला लाभावा हे भाग्यच म्हटले पाहिजे. त्याच्या गुणांच्या वर्णनापेक्षा त्याच्या साहित्याचा आस्वाद अधिक समृध्द करणारा आहे. यासाठीच त्याला कवीकुलगुरु अशी तितकीच तोलामोलाची उपमा दिली गेली. भारतीय संस्कृत साहित्याचे किंवा साहित्यातील उपमा उत्प्रेक्षांचे उगम ठरणारा हा कालिदास पुढच्या अनेक पिढ्या त्याच्या साहित्यातून आपल्या सहवासात राहणार आहेत.